Research Paper- Social Science

# स्त्री शिक्षण कार्यात भारतीय समाजसुधाराकांचे योगदान एक अवलोकन

* डॉ. वर्षा वैद्य ** डॉ. शरद डवरे

**प्रस्तावना :–**

प्राचीन काळापासून स्त्रीयांना शिक्षणाच्या संधी नाकारल्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा घसरलेला दिसून येतो. 19 व्या शतकात स्त्री शिक्षणाविषयी समाज सुधारकांनी व धर्म सुधारकांनी स्त्री–शिक्षणाचा जोराचा पुरस्कार केला. त्यामुळे परंपरागत बंधने व अनिष्ट रूढी कायदयाने बंद करण्यात आल्या. स्वातंष्याच्या लढ्याात स्त्रीया घराबाहेर पडून निरनिराळया सामाजिक व राजकीय क्षेत्रात वावरू लागल्या आहेत. त्यामुळे स्त्री–शिक्षणाला वेगाने चालना मिळाली हे सत्य नाकारता येत नाही. 20 व्या शतकात स्त्रियांनी शिक्षणाचा सर्वच क्षेत्रात शिरकाव केला आहे. आधुनिक काळात अर्थातच बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे मुलींच्या शिक्षणाची अधिकाधिक सोय करण्याचा दृष्टिने आपल्या राष्ट्रीय सरकारचे धोरण अनुकूल आणि पोषक ठरले आहे. आणि म्हणूनच किरण बेदी सारखी पोलीस अधिकारी स्त्री केवळ अधिकार व दंड या जोरावर नाही तर मानवतेचाही दृष्टिकोन ठेवून अशक्य काम शक्य करून दाखविते. आणि अंतराळात प्रवास करणारी कल्पना चावला, एव्हरेस्ट सर करणारी बचेंद्री पाल, पायलट गुंजन सक्सेना, अशा विविध क्षेत्रात नेत्रदिपक कामगीरी करणाऱ्या स्त्रीया समाजाला मार्गदर्शक आहेत. समाजसुधारकांचे स्त्री शिक्षणासारख्या कार्याला मिळालेल्या योगदानाची प्रचीती या सगळया उदाहरणांवरून येते.

**समाजसुधारकांचे योगदान :–**

समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्त्री–शिक्षणा इतके प्रभावी साधन कोणतेही नाही. स्त्रीया बदलल्या तर पुरूषांमध्येही बदल होतो. त्यामुळे समाजामध्ये आपोआपच बदल घडवून येतो. म्हणून परिवर्तन घडविण्यासाठी मुलतः स्त्री–शिक्षणाची आवश्यकता आहे. समाजात ज्ञान, बंधुता यांचा मुलमंत्र असणारे शिक्षण दिल्याशिवाय त्यांचा विकास होणे अशक्य आहे. स्त्री ही क्षमतेचा व कौशल्यांचा पुरेसा वापर करून कुटुंबाची पुनर्रचना करू शकते. त्यामुळे समाजातील अनेक कौटुबिंक समस्यांना सामाजिक स्वरूप येणार नाही. स्त्री ही समाजाची मुलभूत गरज आहे असे महात्मा गांधी म्हणत असत. त्यांच्या मते, ''स्त्रियांच्या अवस्थेत जोपर्यंत सुधारणा होणार नाही तोपर्यंत, समाजाची व कुटुंबाची सुधारणा होणे शक्य नाही. जोपर्यंत आपल्या समाजात खरी माना शिक्षक तयार होणार नाही तोपर्यंत कुटुंबातील मुले शाळेत जाऊनही अशिक्षित राहतील. म्हणून प्रथम स्त्रीयांना शिक्षीत करणे आवश्यक आहे. स्त्रीयांच्या अज्ञानामुळे सामाजिक प्रगतीत अडथळा येतो. असेही समाजसेवकांना वाटु लागले. बालहत्या बंदी, सतीबंदी, बालविवाह प्रतीबांधक कायदा यात सुधारणा होवूनही समाजात बदल झाला नाही. कदाचीत स्त्रीयांमध्ये अज्ञान असल्यामुळे आणि अनिष्ट रूढीविरूद्ध प्रतिकार करण्याचे धैर्य नसल्यामुळे सुधारकांना यश मिळाले नाही. 1796 मध्ये शैक्षणिक काँग्रेस पुढे गोपाळ कृष्ण गोखले यांनी असे मत मांडले की, ''लादलेले अज्ञान व फाजील धार्मिकता यामुळे स्त्रीयाच आपल्या उन्नतीच्या आड येत आहे.'' आणि म्हणूनच समाजसुधारकांनी स्त्रियांचे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू केले. आणि प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी स्त्री ही त्या प्रयत्नाना मिळालेले यश आहे असेही म्हणता येईल. या समाजसुधाकांनी केलेल्या योगदानाचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

**महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्त्री–शिक्षण कार्यात योगदान :–**

स्त्रीयांचे शिक्षण झाल्यावाचून सामाजिक मुक्ततेचे महाद्वार उघडवार नाही. ज्योतीरावांनी स्त्री–शिक्षणाची क्रांतीकारक चळवळ उभी केली. ख्रिश्चन मिशनरी मिस फॅरार यांच्या प्रेरणेतून ज्योतीरावांनी स्त्री–शिक्षणाचे महत्व समाजाला देण्यासाठी इ.स. 1848 मध्ये मुलींची पहीली शाळा पुण्यातील बुधवार पेठेत सुरू केली. मुलींना शिकविण्यासाठी स्त्री–शिक्षीका उपलब्ध नसल्यामुळे प्रथम त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षीत केले. अनेक विरोधाला झुगारून, या विरोधाची पर्वा न करता स्त्री–शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रात त्यांनी चालु ठेवली. या काळापासून स्त्री–शिक्षणाचा खरा प्रारंभ झाला एवढेच नव्हे तर अशा काळात महात्मा ज्योतीबा फुलेंनी वाट चुकलेल्या अनाथ स्त्रीयांचे संगोपन केले. विधवा विवाह, पुर्नविवाह हा विचार समाजात निर्भीडपणे मांडला आणि त्यामार्गाने निर्धारपूर्वक कार्य केले. स्त्रीयांचा उद्धार करणे व त्यातूनच समाजाची सुधारणा करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले.

**महात्मा गांधी यांचे स्त्री शिक्षणासाठी केलेले योगदान :–**

महात्मा गांधीसह शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. उच्च नितीतत्वावर आधारित सहशिक्षण असावे आणि सहशिक्षणांची जबाबदारी करण्यापेक्षा सहशिक्षणास आवश्यक असे पोषक वातावरण निर्माण करण्यावर गांधीजींनी भर दिला. गांधीजींनी स्त्री–शक्ती जागृत करून स्त्री–मुक्तीचा पुरस्कार केला. त्यांच्या प्रेरणेमुळे सार्वजनिक चळवळींमध्ये फार मोठया प्रमाणात स्त्रीया सहभागी झाल्या. गांधीजींच्या आश्रमात स्त्रीया व पुरूष बंधु–भगिनी प्रमाणे स्वाभाविक कौटुंबिक वातावरणात रहात असत. स्त्री–पुरूषाचे सहजीवन व सहशिक्षण कौटुंबिक मर्यादा सांभाळून केले पाहिजे. त्यांनी बुनीयादी शिक्षण संस्थेमध्ये व वसतीगृहांमध्ये मुलांबरोबर मुलीनाही प्रवेश दिला. यामुळे स्त्री शिक्षणाला फार मोठी चालना मिळाली. निसर्गाने स्त्रीयांना काही विशिष्ट गुण बहाल केले आहेत. म्हणूनच त्यांच्या क्षमतांचा विकास व्हावा, असे त्यांना वाटे स्त्रीयांना शासनमुक्त व शोषणमुक्त जीवन जगता यावे असे शिक्षण प्रत्येक

स्त्रीला मिळावे, असे त्यांचे मत होत.

**राजा राममोहन रॉय यांचे शिक्षणासाठी केलेले योगदान :–**

राजा राममोहन रॉय यांनी स्त्री–शिक्षणाचा प्रसार करणाच्या मोठा प्रयत्न केला. ब्राम्हो समाजानेही स्त्री–शिक्षणाचा पुरस्का केला होता. भारतीय समाजात स्त्री–शिक्षणाविषयी अतीशय गैरसमाज होते हे दूर करण्याचे कार्य त्यांनी केले. राजा राममोहन रॉय यांचे सर्वात श्रेष्ठ कार्य म्हणजे सतीप्रथा बंद करणे हे होय. स्त्रीला समाज हक्क प्राप्त व्हावे. विधवांना प्रतिष्ठेने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्नांनी पराकाष्टा केली.

**महादेव गोविंद रानडे यांचे स्त्री–शिक्षणासाठी केलेले योगदान :–**

आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या चळवळीचे आद्य प्रनेते व भारताच्या सर्वांगीण जागृतीचे एक श्रेष्ठ प्रवर्तक म्हणून न्या. गोविंद रानडे यांचा उल्लेख होतो. स्वातंष्य व शिक्षण दिल्यास स्त्रीया स्वराचारीनी बनतील हया चुकीच्या समजूती आहेत. हे त्यांनी लोकांना दाखवून दिले. आपली सत्ता स्त्री–समाजावर चालवावी यासारखी अधमपणाची दुसरी कसोटी नाही असे त्यांना वाटे स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, पुर्ननिवाह इत्यादी बहुतेक कार्यात न्यायमुर्तींनी सुधारकांचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या उन्नतीसाठी निर्माण झालेल्या प्रत्येक संस्थेत व चळवळीत त्यांनी पुढाकार घेतला आणि समाजात नवी क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**सावित्रीबाई फुले यांचे योगदान :–**

मानव जातीतील अनिष्ट रूढी, परंपरा, अज्ञान याचे उच्चाटन करण्याकरिता निश्चयाचा अलौकिक धुवरूपी तारा पृथ्वी तलावर सावित्रीबाईच्या रूपाने आला. रूढी, परंपरेविरूद्ध रणशिंगे फुंकणाऱ्या सावित्रीबाई फुले या जगातील एकमेव मानवधर्माच्या रक्षण कर्त्या ठरल्या. समाजाची प्रतिष्ठा व्यक्तीविकासाचे महत्व व स्वातंष्य या मुल्यांचा अंतर्भाव शिक्षणात पाहिजे. त्यामुळे वैचारीक परिवर्तन करण्यास लिहीता–वाचता येणे आवश्यक आहे. परंपरावादी व कर्मकांडावर जगणाऱ्या भारतीय समाजाला रोखण्याकरीता शिक्षणाची नितांत आवश्यकता असल्याची जाणीव सावित्रीबाईंना होती. ज्या काळात स्त्रीला स्वतंष्य अस्तीत्व नव्हते, त्या काळात त्या समाजसुधारणेच्या कार्यासाठी उभ्या राहील्या. ज्योतीरावांवाकडून प्रेरणा घेवून विरोधाला न घाबरता त्यांनी इच्छीत कार्य यशस्वी करून दाखविली. बालविवाह, केशवपण, सतीची चाल, या सर्व चालीबद्दल त्यांना मनापासून चीड होती. त्यांनी मुलींच्या शाळेतून नितीमुल्यांचे व स्वःहक्काचे धडे दिले. त्यांनी या कार्याला आपले तन–मन–धन अर्पण केले.

**पंडिता रमाबाई यांचे योगदान :–**

ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यानंतर स्त्री शिक्षणविषयक तळमळीने कार्य करणाऱ्या पंडीता रमाबाई होत्या. स्त्रियांची सर्वांगीन उन्नती व्हावी म्हणून त्यांनी पुण्यामध्ये आर्य महीला समाजाची स्थापना केली. व महाराष्ट्राभर प्रसार केला. स्त्रियांना सुशिक्षीत व योग्य हक्क दिल्याने स्त्रियांची उन्नती होईल या गोष्टींवर त्यांचा विश्वास होता. स्त्रीने स्वावलंबी व्हावे, समाजात सम्मानाने जगावे याकरीता मुंबई येथे शारदा सदनाची स्थापना केली.महाराष्ट्रातून इंग्लंडमध्ये जाणारी पहिली स्त्री पंडीता रमाबाई होय. स्त्री–शिक्षणातून स्त्री–सुधारणा करण्याचा लक्षवेधी प्रयत्न त्यांनी केला. वैधव्यानंतरही स्त्री उद्धाराचे कार्य केले. एकंदरीत पाहता रमाबाईंनी स्त्रीयांचा उद्धारासाठी केलेले कार्य महत्वाचे आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे योगदान :–**

राष्ट्रसंतांनी स्त्रीयांना 'माऊली' म्हणून संबोधीले आहे. समाजाचे चारिष्य घडविणारी मातृशक्तीच आहे. म्हणून ते मातृशक्तीला नतमस्तक होतात. चातुर्य, प्रसंगावधान, दुरदृष्टी, संयम, शहानपण या गुणामध्ये स्त्रीया आघाडीवर आहेत. त्यामुळे त्या पुरूषापेक्षा सरस आहेत असा कबुली जवाब ते देत. स्त्रीयांना अबला, गुलाम, म्हणून संबोधतो हे शहाण्या माणसाचे लक्षात नाही असे ते म्हणत. राष्ट्रसंतांना स्त्री आणि पुरूष ही समाजरथाची दोन चाके आहेत आणि म्हणूनच दोघांनाही सारखे महत्व दिले. समाजाचा विकास व्हायचा असेल तर सर्वप्रथम स्त्री–शिक्षणाला प्राध्याण्य दयावे लागेल. मुलांप्रमाणे मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देवून स्त्रीयांच्या आंतरिक गुणांचा विकास करणाऱ्या शिक्षणाची आज खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे. असे त्यांना वाटत असे.

**निष्कर्ष :–**

स्त्री ही समाजातील मोठी शक्ती असून या शक्तीचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उपयोग होणे गरजेचे आहे. समाजात एकात्मता आणण्यासाठी तसेच कोणत्याही संकटांना तोंड देण्यासाठी स्त्री–शिक्षण महत्वाचे आहे हे समाजसुधारकांनी त्या काळी जाणले. त्याचे फल स्वरूप झाल्याचे आम्हाला आज दिसते. आपल्या देशात लोकशाही असल्यामुळे आणि संविधानाने स्त्री आणि पुरूषांना समान दर्जा असल्यामुळे लोकशाही यशस्वी होण्यासाठी स्त्रीचा राजकीय सत्तेमध्ये सहभाग असायला पाहिजे. स्त्रीला सक्षम होण्यासाठी, तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, तीला पुरूषाच्या बरोबरीने कार्य करण्यास आवश्यक असलेले ज्ञान संपादन करण्याची संधी या सर्व समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नांनी मिळाली हे सत्य आजही नाकारत येत नाही. स्त्रीच्या अस्तित्वाची, नेतृत्वाची जाणीव या सर्व समाजसुधारकांनी जाणली आणि म्हणूनच शिक्षित होवून आज ती प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असलेली दिसते. तीचे 'मानव' म्हणून जगणे आज समाजाने स्वीकारले आहे याचे श्रेय या सर्व समाजसुधारकांना जाते.

***** – ** कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोराडी***

**संदर्भ ग्रंथ**

1. ''महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा''– मेघा नानीवडेकर 2. ''पंधरा महान राष्ट्रपुरूषांचा जीवनकथा''–गो.द. पहीनकर